भाजीपाला

# हरितगृहात घेता येईल ढोबळ्या मिरचीचे दर्जेदार उत्पादन



**प्रा. पल्लवी घुले**
(मो.नं. ९१७२०६५५५५)
क.का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक



हिरवा, लाल, पिवळा, जांभळा आणि पांढरा असे मोहक रंग असलेल्या अनेक जाती ढोबळ्या मिरचीत आढळतात. हरितगृहात लागवड करण्यासाठी इनडिटरमिनेट जातीची निवड करावी जेणेकरून झाडाची वाढ, फुले व फळधारणा नियमित होईल. इंद्रा, कॅलिफोर्निया वंडर, बॉम्बी, ऑरोबेल यासारख्या अधिक उत्पादन देणाऱ्या जाती निवडाव्यात. हरितगृहातील लागवडीसाठी ढोबळ्या मिरचीचे २० ते ३० ग्रॅम बियाणे १० गुंठे क्षेत्रासाठी पुरेसे आहे.

ढोबळ्या मिरचीचा उगम ब्राझील या देशामध्ये झाला असून ती सोलानेसी कुळातील आहे. या निर्यातक्षम भाजीला 'सिमला मिरची' किंवा 'भोपळी मिरची' या नावाने देखील ओळखले जाते. इंग्रजीमध्ये कॅप्सिकम किंवा स्वीट पेपर असेही संबोधतात. यामध्ये 'अ' आणि 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात आहे. अलीकडच्या काळात फास्टफूडचे प्रमाण वाढल्यामुळे या मिरचीला वर्षभर चांगला बाजारभाव मिळत आहे. ढोबळ्या मिरचीचा वापर सॅलड, स्टड किंवा डिशमध्ये सुबक मांडणीसाठी होतो. सॅलडच्या डिशेसमध्ये लाल ढोबळ्या मिरचीला मोठी मागणी असते. हिरव्या ढोबळ्या मिरचीपेक्षा दुप्पट ते तिप्पट भाव लाल ढोबळ्या मिरचीला मिळतो.

महत्त्वाचे म्हणजे हे पीक समशीतोष्ण हवामानात येणारे नाजूक पीक असून, बदलत्या हवामानातले कडक ऊन, ढगाळ हवा, धुके, हलका किंवा मुसळधार पाऊस, कडाक्याची थंडी अथवा ढगाळ हवेतील गरम व दमटपणा या पिकास अनुकूल नाही. म्हणूनच हरितगृहात ढोबळ्या मिरचीची लागवड केल्यास पिकास संरक्षण मिळून जास्तीत जास्त उत्पादन व आर्थिक फायदा, तसेच उत्तम प्रतीची ढोबळी मिरची मिळविता येते. हरितगृहामुळे आपल्याला निरनिराळ्या रंगाची ढोबळी मिरची पिकवणे शक्य झाले आहे. फळांच्या रंगाबरोबरच उत्पादन क्षमता, फळांचा आकार, प्रतवारी, झाडाच्या



वाढीचा प्रकार आणि मार्केटमधील मागणी आदी घटकांवर सुद्धा जातींची निवड अवलंबून असते.

**सुधारित जाती :** हिरवा, लाल, पिवळा, जांभळा आणि पांढरा असे मोहक रंग असलेल्या अनेक जाती ढोबळ्या मिरचीत आढळतात. हरितगृहात लागवड करण्यासाठी इनडिटरमिनेट जातीची निवड करावी जेणेकरून झाडाची वाढ, फुले व फळधारणा नियमित होईल. इंद्रा, कॅलिफोर्निया वंडर, बॉम्बी, ऑरोबेल यासारख्या अधिक उत्पादन देणाऱ्या जाती निवडाव्यात. हरितगृहातील लागवडीसाठी ढोबळ्या मिरचीचे २० ते ३० ग्रॅम बियाणे १० गुंठे क्षेत्रासाठी पुरेसे आहे.

**रोपे तयार करणे :** रोपे तयार करण्यासाठी रूट ट्रेनर्सचा वापर करावा. हे शक्य नसल्यास प्लॅस्टिक कप किंवा गादीवाफ्यावर रोपे तयार करावीत. शेणखत, वाळू, लाल माती व कोकोपीट इत्यादींचे मिश्रण, निर्जंतुकीकरण करून घ्यावे. हे मिश्रण रूट ट्रेनरमध्ये भरून प्रत्येकी एका सेलमध्ये एक बी टाकावे. हरितगृहामध्ये साधारणत: ३० ते ४० दिवसांत रोपे तयार होतात. रोपांची वाढ जोमदार होण्यासाठी विद्राव्य नत्र, स्फुरद व पालाश यासारखी खते



द्यावीत.

**लागवड :** ढोबळ्या मिरचीची लागवड करण्यासाठी १ मी. रुंद व जमिनीपासून ३० ते ४० सें.मी. उंच गादीवाफे बनवावेत. यासाठी चांगली सुपीक पोयट्याची अथवा लाल माती व शेणखत वापरावे. दोन गादी वाफ्यातले अंतर ५० सें.मी. ठेवावे. लागवडीच्या पंधरा ते वीस दिवस अगोदर तयार केलेले गादीवाफे फॉर्मल डिहाईडच्या द्रावणाने निर्जंतुक करून घ्यावे. ३० ते ४० दिवसांची रोपे लागवडीसाठी योग्य असतात. रोपांची लागवड करताना मोनोक्रोटोफॉस, कॉपर ऑक्सिक्लोराईड व रिडोमिलच्या द्रावणात बुडवून लागवड करावी. गादी वाफ्यावर ४५ x ६० सें.मी. आकाराच्या खाचा बनवून सकाळी किंवा दुपारनंतर कमी तापमानात लागवड करावी. लागवडीनंतर ताबडतोब पाणी द्यावे. हरितगृहामध्ये पाणी देण्यासाठी शक्यतो ठिबक सिंचनाचा वापर करावा. झाडांना आठवड्यातून एकदा बाविस्टीन किंवा कॅपटॉपचे ड्रेन्चिंग करावे.



**खते :** १०० किलो नत्र, ५० कि. स्फुरद आणि ५० कि. पालाश प्रतिहेक्टरी द्यावे. या व्यतिरिक्त ठिबक सिंचनाद्वारे आठवड्यातून दोन वेळा विद्राव्य खतातून झाडांना पोषण द्यावे. या पिकाला माती, पाणी तपासणीनुसार आणि पिकाच्या वाढीच्या अवस्थांनुसार खतांच्या मात्रा ठिबक संचातून द्याव्यात. उदा. नत्र ३३० पीपीएम, फॉस्फरस १५ पीपीएम, पोटॅश १७० पीपीएम, कॅल्शियम ७५, मॅग्नेशियम ३० आणि सल्फेट ४० पीपीएम या प्रमाणात द्यावे.

**झाडांना वळण देणे :** लागवडीच्या तीन आठवड्यांनंतर झाडांना दोन किंवा चार फांद्यांमध्ये वाढवावे. अनावश्यक फांद्यांची छाटणी करावी. हे दर पंधरा दिवसांनी करावे. झाडांना आधार देण्यासाठी फांद्यांना नायलॉन किंवा प्लॅस्टिक दोरीने बांधावे. जमिनीस समांतर व जमिनीपासून ३ मी. उंचीवर लावलेल्या लोखंडी तारांना या दोऱ्या बांधाव्यात. रोपे लागवडीतील अंतर हे झाडांना वळण देण्याच्या पद्धतीवर, आधार देण्याच्या पद्धतीवर तसेच छाटणीच्या/ आकार देण्याच्या पद्धतीवर अवलंबून असते. तरीसुद्धा १ चौ.मी. क्षेत्रावर ६ ते ७ खोडे हिशोबाने यायला हवीत. बहुतेक ठिकाणी छाटणी करताना एका झाडावर दोन खोडे ठेवण्याची पद्धत आहे.

**विरळणी :** दोन मुख्य फांद्या पद्धतीत सर्वसाधारणपणे खोडावरील दुसऱ्या किंवा तिसऱ्या बेचक्यात बाजूच्या फुटव्यापर्यंत फळधारणा लांबवावी. फळांची चांगली वाढ होण्याकरिता लहान, वाढ न झालेली फळे काढून टाकावी. ४ ते ६ फळे पहिल्या बहारामध्ये चांगल्याप्रकारे वाढतात. पहिल्या बहारानंतर विरळणी ही फक्त लहान, रोगट फळांकरिताच करावी. खूप वेळा विरळणी करू नये.

**कीड व रोगनियंत्रण :** हरितगृहातील ढोबळ्या मिरचीवर प्रामुख्याने फुलकिडे, मावा, तुडतुडे, फळे पोखरणारी अळी या किडी तसेच भुरी रोगाचा प्रादुर्भाव होतो. त्यांच्या नियंत्रणासाठी व्हर्टिमेक ५ मि.लि./ लि., ॲसिड ॲमिप्रिड १ ग्रॅम/ लि., मॅलॉथिऑन १७ मि.लि./ १० लि., सल्फर १० मि.लि./ १० लि., क्लोरोपायरिफॉस १७ मि.लि./१० लि. यांची फवारणी करावी.

**काढणी :** लागवडीनंतर ५० ते ६० दिवसांत ढोबळ्या मिरचीचे उत्पादन सुरू होते. फळांची काढणी आठवड्यातून एकदा करावी. फळे तोडणीसाठी तीक्ष्ण चाकूचा वापर करावा. साधारणत: ८ ते १० वेळा फळांची काढणी केली जाते. हरितगृहामध्ये ९० ते १२० टन/ हे. ढोबळ्या मिरचीचे उत्पादन मिळते. ■